रयत शिक्षण संस्थेचे,

# स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन श्रीरामपूर

## Certificate Course in Gandhian Thoughts

## Gandhi Vichar Darshan

## गांधी विचार दर्शन परीक्षा



**स्थापना**

आजचा छात्राध्यापक उद्याचा देशाची नवी पिढी घडविणारा महत्वाचा घटक असल्याने, सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षात, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे विचार व मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजावे हा उद्देश ठेऊन महाविद्यालयात गांधी रिसर्च फौंडेशन जळगाव यांच्या सहकार्यातून गांधी विचार दर्शन परीक्षा घेण्यात येते.

**गांधी विचार दर्शन परीक्षेची उद्दिष्टे**

१. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जीवनकार्याची छात्राध्यापकांना ओळख करून देणे.

२. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी विश्वाला दिलेल्या मुल्यांची छात्राध्यापाकांना ओळख करून देणे.

३. राष्ट्रपिता महात्मा गांधी याचं शिकवण छात्राध्यापाकांमध्ये बिंबवणे .

४. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारसरणीतील सुजाण व जागृक नागरिक घडविणे.

**गांधी विचार दर्शन परीक्षा ‘ फी ’ स्वरूप**

गांधी विचार दर्शन परीक्षेअंतर्गत प्रत्येकी विद्यार्थ्यांकडून ५० रु. या प्रमाणे फी घेण्यात येते. तसेच गांधी रिसर्च फौंडेशन जळगाव याचे मार्फत सहभागींना राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे, माझे सत्याचे प्रयोग हे पुस्तक देण्यात येते. व परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येते.

**गांधी विचार दर्शन परीक्षा अंतर्गत उपक्रम :**

गांधी विचार दर्शन परीक्षा अंतर्गत माझे सत्याचे प्रयोग या पुस्तकावर आधारित वाचन व चर्चा वर्गामध्ये घेण्यात येते.

**गांधी विचार दर्शन परीक्षा स्वरूप :-**

गांधी विचार दर्शन परीक्षा ही ७० गुणांची आहे, यामध्ये ७० प्रश्न असतात व प्रत्येक प्रश्नासाठी ०१ गुण आहे.